नि. फौजदारी खटला क्र. <u>९६/२०२४</u>
सरकार विरूद्ध शितल नितीन व अन्य एक
**निशाणी १३**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. १ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : रमेश महादेव वाकोडे
वय : ५६ वर्षे,
धंदा : शेती काम,
राहणार : रूईखेड, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. पी. एल. हरणे यांचेमार्फत —**

दि. ०९/०२/२०२४ रोजी पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते. पोलीसांनी माझेसमक्ष पंचनाम्याची कारवाई केली नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. परंतु मला त्यातील मजकुर माहित नाही. सदर सही मी कोकाटे यांच्या घराजवळ पोलीसांच्या सांगण्यावरून केली होती.

२. दि. २६/०३/२०२४ रोजी पोलीसांनी मला जप्ती पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते. पोलीसांनी माझेसमक्ष जप्ती पंचनाम्याची कारवाई केली नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. परंतु मला त्यातील मजकुर माहित नाही. सदर सही देखील मी कोकाटे यांच्या घराजवळ पोलीसांच्या सांगण्यावरून केली होती.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

३. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९/०२/२०२४ रोजी रूईखेड गावी फिर्यादीच्या घरासमोर पोलीसांनी मला घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने माझेसमक्ष पोलीसांना घ टनास्थळ दाखवले व त्याठिकाणी पोलीसांनी माझेसमक्ष सविस्तर घटनास्थळ पंचनामा तयार केला व तो वाचुन मी त्यावर घटनास्थळी सही केली होती.

४. हे म्हणणे खरे नाही की, दि. २६/०३/२०२४ रोजी आरोपी क्र. १ हिच्या ताब्यातुन अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात एक ओबडधोबड दगड जप्त केला व त्याबाबत माझेसमक्ष सविस्तर जप्ती पंचनामा तयार केला व तो वाचुन मी त्यावर सही केली होती.

५. मी इयत्ता चौथी पर्यंत शिकलो असुन, मला लिहिता—वाचता येते व मी कुठल्याही दस्तावर वाचुन समजुन घेतल्याशिवाय मी सही करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपींना ओळखतो ते माझे गावातील आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — दोन्ही आरोपींतर्फे ॲडव्होकेट श्री. डी.डी. वर्मा यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०४.१२.२०२५
अकोट

(ए.ए. माळी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र. २)
अकोट, ता. आकोट, जि. अकोला.